<u>**उलट तपास आरोपी क. १ ते ४ तर्फे ॲड. श्री. एस.एच.काझी**</u>

**१०.** हे खरे आहे की, घटना घडली होती तेंव्हा आंधार पडला होता. पोलीसांनी माझा पुरवणी जबाब घेतला नाही. घटनास्थळ पंचनामा माझे समक्ष झाला. पोलीसांनी आरोपीच्या घ रातून दगड, लोखंडाची फुकणी आणि काठी जप्त केले. पोलीसांनी मुद्देमाल घटनेच्या दुस—या दिवशी माझे समक्ष जप्त केला. मी पोलीसांना बयाण देते वेळी सांगितले की, कोणत्या, कोणत्या वस्तुने शरीराच्या कोणत्या, कोणत्या भांगावर मारहाण केली. मी डॉक्टरांना कंबरेवरील व खांद्यावरील मार दाखविला होता. मला सर्व प्रथम पोलीस ठाण्यात नेले होते. पोलीसांनी मला दवाखान्यात जाण्यासाठी पत्र दिले होते. हे खरे नाही की, मी खोटे सांगितले की, सर्व प्रथम मला पोलीस ठाण्यात नेले व त्यानंतर पोलीसांनी मला पत्र देवून दवाखान्यात पाठविले व डॉक्टरांना खांद्यावर व कंबरेवर मार लागल्याचे सांगितले. हे खरे नाही की, माझे आणि माझे मुलाचे डोके फुटले नव्हते. हे खरे नाही की, दगड, काठी आणि लोखंडी पाईप हे प्रत्येक ठिकाणे सहजरित्या उपलब्ध आहे. दगड, काठी व लोखंडी पाईपवर आमच्या रक्ताचे डाग होते का हे मी बघितले नाही. मला त्या रात्री व दुस—या दिवसभर चक्कर होती.

**प्रश्नः—** तुमचे बयाण घेण्यापूर्वी डॉक्टरांनी तुम्हाला तपासले होते काय?

**उत्तरः—** मी सुरुवातील दवाखान्यात तपासणी करुन व उपचार घेवून नंतर पोलीस स्टेशनला येवून बयाण दिले.

हे खरे नाही की, वास्तविकते मध्ये मीच आरोपींनी त्यांच्या प्लॉटमध्ये माती टाकल्यावरुन त्यांच्याशी भांडण केले व माझा मुलगा अझर याने लोखंडी पाईपने आ.क्र. ३ यासमिन बेगम हिला मारहाण करुन जखमी केले. हे खरे नाही की, त्या मारहाणीमुळे आ.क्र. ३ यासमिन हिच्यावर उपचार झाले व पोलीसांनी अदखलपात्र गुन्ह्याची नोंद झाली. हे खरे नाही की, आरोपींनी आमच्यावर फौजदारी प्रकरण दाखल करु नये या उद्देशाने डॉक्टरांशी संगनमत करुन खोटे वैद्यकिय प्रमाणपत्र करुन खोटी केस दाखल केली. हे खरे आहे की, आ.क्र. ३ ने न्यायालयात तक्रार दाखल केली असून ती आज रोजी न्यायालयात प्रलंबित आहे. हे खरे नाही की, आरोपींनी मला व माझे मुलाला कधीही मारहाण केली नाही. हे खरे नाही की, माझे नातेवाईकांच्या मदतीने मी खोटी केस दाखल केली आहे. हे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

<u>फेर तपास नाही.</u>

माझे समक्ष व श्रवणोत्तर स्विकृती

स्वाक्षरीत/—

**( एस. ए. हरणे )**

दिनांकः—०३.०४.२०२३.

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, धर्माबाद